ठाणे महानगरपालिका, ठाणे.

वृक्षप्राधिकरण

जाहीर सूचना (मसूदा)

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ३ (३) व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १५५/२०१३ मधील दि. १३ फेब्रुवारी २०१५ रोजी दिलेले आदेशानुसार मा. वृक्षप्राधिकरण समितीवर १३ सदस्यांची नेमणूक करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

मा. उच्च न्यायालयाच्या या संदर्भातील आदेश व अधिनियमातील कलम ३ (३) अन्वये खालील प्रमाणे अर्हता निश्चित करण्यात येत आहे.

१. अर्जदार व्यक्ती ठाणे महानगरपलिका क्षेत्रामधील रहिवाशी असावा.
२. व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत अशासकीय संस्थेचा सक्रीय सदस्य असेल.
३. तसेच त्यांना वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि वृक्ष संरक्षण इत्यादीमध्ये रूची असेल, आणि त्यांना या क्षेत्रातील किमान १० वर्षांचा अनुभव प्राप्त असावा.
४. अर्जदाराची कृषी/वन/उद्यान विद्या शास्त्राची पदवी शैक्षणिक अर्हता असल्यास प्राधान्य.

तरी उपरोक्त पात्रता असणाऱ्या प्रतिनिधींनी संपूर्ण माहितीसह भरलेले अर्ज (आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह) नागरी सुविधा केंद्र, तळ मजला, महापालिका भवन, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे (प.) ४०० ६०२ येथे कार्यालयीन वेळेत सदरची जाहिर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत सादर करण्यात यावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. सदरची सुचना ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(ओमप्रकाश दिवटे)
उप-आयुक्त (वृक्षप्राधिकरण)
ठाणे महानगरपालिका, वृक्षप्राधिकरण.

(मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेस)